गुरुवार, दि. २६ जून २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३२० वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### ५५ दिवसांपासून शेतकऱ्यांचे आंदोलन

# केएमएलचा शासन निर्णय पुर्वलक्षी प्रभावाने लागू करता येणार नाही - माजी मंत्री टोपे

### सरकारने शेतकऱ्यांच्या रास्त मागण्या मान्य कराव्यात



**जालना । प्रतिनिधी -** नांदेड-जालना समृध्दी महामार्गाची अधिसुचना जाहिर झाल्यानंतर प्रशासनाच्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी केलेल्या संयुक्त मोजणीच्या वेळी बाधीत क्षेत्रावर दिसून आलेली फळझाडे, विहिरी, राहती घरे, गोठे, तारकंपाऊंड आणि शेततळे ग्राह्य धरणे कायद्याने बंधनकारक असून, तसे करणे क्रमप्राप्त ठरते. अधिसुचना ११ डिसेंबर २०२१ रोजी जाहिर झालेली असतांना सन २०२३ साली काढलेला केएमएल अर्थात सॅटेलाईट सर्व्हेचा शासन निर्णय पुर्वलक्षी प्रभावाने कसा जाहिर करता, असा सवाल उपस्थित करीत संयुक्त मोजणीत दिसून आलेल्या सर्व घटकांचे रास्त मुल्यांकन करण्यात यावे, अशी मागणी श्री. टोपे यांनी बुधवार (ता. २५) रोजी देवमुर्ती येथे केली.

नांदेड-जालना समृध्दी महामार्ग बाधीत शेतकरी गेल्या ५५ दिवसांपासून देवमुर्ती (ता. जालना) येथील वृंदावन गोशाळेच्या पायथ्याशी बाधीत जमिनीत धरणे आंदोलन करीत असून, श्री. टोपे यांनी आंदोलनस्थळी भेट देवून शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. त्यानंतर ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, सन २०२०-२१ साली महाविकास आघाडीचे सरकारमध्ये आपण मंत्री असतांना जालना-नांदेड समृध्दी महामार्गाला मंजुरी देण्यात आलेली असून, अधिसुचनेला ४ वर्षे उलटुनही अंतिम अवॉर्ड निश्चित करण्यात आलेले नाही. बाधित शेतकऱ्यांच्या मुल्यांकनातील अडी-अडचणी सोडवण्यात महायुती सरकारला अपयश आल्यानेच गेल्या ५५ दिवसांपासून हे आंदोलन सुरु आहे. यापुर्वी ज्या-ज्या वेळेस बाधित शेतकरी माझ्याकडे आले त्या-त्या वेळेस आपण संबंधित अधिकाऱ्यांना सुचना दिल्या. तरीही आजपर्यंत मुल्यांकनाचा प्रश्न प्रलंबीत ठेवल्याने शेतकऱ्यांवर घोर अन्याय होत आहे. बाधीत शेतकऱ्यांना सहानुभूतीपूर्वक विचार करुन मावेजा देण्यात यावा तसेच अधिसुचनेपुर्वीच्या ३ वर्षातील खरेदी-विक्रीचे उच्चांकी व्यवहार आणि रेडिरेकनर या मधील सरासरी काढून त्यानुसार मावेजा देण्यात यावा. तथापि, सन २०१७ पासून आजपर्यंत म्हणजेच गेली ८ वर्षे रेडिरेकनरमध्ये वाढ करण्यात आलेली नसल्याने बाधीत जमिनींचे

पान २ वर

#### अधिसुचनेनंतर ४ वर्षांनी पुर्वीचे भाव कसे पकडता

नांदेड-जालना समृध्दी महामार्गाची अधिसुचना निघून जवळपास ४ वर्षे उलटली असून, आजपर्यंत बहुतांश शेतकऱ्यांचे निवाडे झालेले नाहीत. अशा परिस्थितीत बाधीत शेतकऱ्यांच्या जमिनीसह फळझाडे आणि इतर अचल मालमत्तांचे मुल्यांकन चालू बाजारभावानुसार करण्याऐवजी ४ वर्षापुर्वीचे बाजारभाव कसे ग्राह्य धरता, असा सवाल श्री. टोपे यांनी यावेळी केला.

संविधान हत्या दिवस-२०२५ कार्यक्रम

## जिल्हाधिकारी कार्यालयात आणीबाणीतील चित्रांचे प्रदर्शन महिनाभर खुले राहणार



**जालना । प्रतिनिधी -** देशात २५ जून १९७५ रोजी आणीबाणी लागू करण्यात आली होती. या घटनेला आज ५० वर्षे पूर्ण झाली आहेत. यानिमित्ताने आणीबाणीत लढा दिलेल्या जालना जिल्ह्यातील व्यक्तींचा जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते शाल, प्रमाणपत्र व गुलाबपुष्प देवून सन्मान करण्यात आला. जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी उपस्थित सर्वांचे कार्यक्रमाला उपस्थित राहिल्याबद्दल आभार मानले. मानधन प्रक्रिया अधिक सुलभ करण्याचे नियोजन केले असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. तसेच मानधनासंदर्भात काही अडचणी असल्यास त्या संबंधित कक्षात नोंदविण्याचे आवाहनही जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी यावेळी केले.

आणीबाणीला ५० वर्षे पुर्ण भारतीय इतिहासातील काळाकुट्ट अध्याय..! संविधान हत्या दिवस-२०२५ या कार्यक्रमाचे जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी आमदार नारायण कुचे, अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडीक, उपविभागीय अधिकारी शशिकांत हदगल यांच्यासह आणिबाणीत कारावास भोगलेल्या व्यक्तींची उपस्थिती

पान २ वर

युवा आदर्श

### सांत्वन गर्दीत ...

आपत्तीग्रस्त सांत्वना
उसळली अलोट गर्दी
जणू चालला सोहळा
अनोळखी असे अर्धी
सोडू नका महाप्रयासे
लाभली रे सुवर्णसंधी
प्रसिद्धी झोतात रहावे
वेळ साधू करावी चांदी
सजून बसली मिडिया
अपडेट करतात यादी
स्पर्धा आसवे पुसण्या
कोण नेते आले आधी
डोळे दाखवे पाणावले
उमाळा उसळे कागदी
प्रत्येक स्वार्थी विभीन्न
टीआरपी वसूल नगदी
मदत मिळव सरकारी
वळवावा इकडे निधी
घ्यावे आपण ओसंडून
दुथडी भरून वाहे नदी
कनवाळू किती साहेब
जन समुदाय लागेनादी
सुप्त हेतू आपलासाधी
अंतिमता मिळवू गादी
हो आजारी समाजमन
शोबाजीची लागेव्याधी
आगंतुकाच्यागोंधळात
रे मुळीचं पुरेना अवधी

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

सातोना येथे महिला बचत गटांना आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते १३ लाख ६० हजार रुपयांचे कर्ज वितरण

# पर्यावरणाची काळजी, आर्थिक बचत आणि भविष्यातील ऊर्जेची गरजा पूर्ण करण्यासाठी सौर ऊर्जा महत्त्वाची आणि फायदेशीर

### माजीमंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांचे प्रतिपादन





**परतूर । प्रतिनिधी -** सौर ऊर्जेचे अनेक फायदे असून ते पर्यावरणासाठी तसेच आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचे आहे. सौर ऊर्जा ही स्वच्छ ऊर्जा आहे. जीवाश्म इंधनाच्या तुलनेत, सौर ऊर्जेचा वापर केल्यास प्रदूषण कमी होते. ग्रीनहाऊस वायूंचे उत्सर्जन कमी होते. वातावरणातील बदलांवर नियंत्रण ठेवण्यास मदत करते. सौर ऊर्जेमुळे वीज बिल वाचते. सौर पॅनेल बसवल्यास, घरासाठी किंवा व्यवसायासाठी लागणारी वीज आपण स्वतःच निर्माण करू शकतो. सौर ऊर्जेवर चालणाऱ्या उपकरणांच्या वापरामुळे खर्चात बचत होते. सौर ऊर्जा ही एक महत्त्वाची आणि फायदेशीर ऊर्जा असून पर्यावरणाची काळजी घेणे, आर्थिक बचत करणे आणि भविष्यातील ऊर्जा गरजा पूर्ण करण्यासाठी सौर ऊर्जेचा वापर करणे आवश्यक आहे असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी केले.

परतूर तालुक्यातील वाटूर (२७८ लाभार्थी) व सातोना (११३९ लाभार्थी) अशा एकूण १४१७ घरावर हर घर सोलार योजने अंतर्गत सोलार बसविण्याच्या कामाचा शुभारंभ आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते करण्यात आला. हर घर सोलार ही योजना महावितरणच्या घरगुती ग्राहकांसाठी लागू असून छतावरील सौरऊर्जा पॅनेलद्वारे वीजनिर्मिती, घरगुती वापरापेक्षा जास्त झाल्यास वीजबिल शून्य होणार आहे. जास्त निर्मित ऊर्जा महावितरणला विकून उत्पन्न मिळविण्याची सुवर्ण संधी असून वीज ग्राहकांना त्यांच्या बँक खात्यात डीबीटीद्वारे खालीलप्रमाणे अनुदान वितरित केले जाणार आहे. असे प्रतिपादन आमदार बबनराव लोणीकर यांनी केले.

केंद्र सरकारकडून १ किलोवॅटपर्यंत ३० हजार रुपये रुपये, २ किलोवॅटपर्यंत ६०हजार, ३ किलोवॅट ७८ हजार रुपये (कमाल), राज्य सरकारकडून १ किलोवॅटपर्यंत १५ हजार रुपये रुपये, २ किलोवॅटपर्यंत ३० हजार, ३ किलोवॅट ३८ हजार रुपये (कमाल) अनुदान दिले जाणार आहे. १ किलोवॅटपर्यंत केंद्र व राज्य सरकार मिळून ४५ हजार रुपये रुपये, २ किलोवॅटपर्यंत ९० हजार, ३ किलोवॅट ११६ हजार रुपये (कमाल) अनुदान मिळणार आहे. गृहनिर्माण संस्था, घर पर संकुलासाठी २० लक्ष रुपये (कमाल), ५०० किलोवॅट पर्यंत स्थापित क्षमतेनुसार १८.०० रुपये प्रति किलोवॅट, छतावरील सौर ऊर्जेद्वारे दरमहा वीजनिर्मिती १ किलोवॅट मध्ये १२० युनिट, २ किलोवॅट मध्ये २४० युनिट, ३ किलोवॅट ३६० युनिट वीज निर्मिती केली जाणार आहे. २५ वर्षापर्यंत वीजनिर्मिती क्षमता असून

पान २ वर

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जन्मदिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा जन्म दिवस दि.२६ जुन दरवर्षी सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा करण्यात येतो. तरी सामाजिक न्याय दिनाच्या निमित्ताने दि.२६ जुन २०२५ रोजी सकाळी १० वाजता भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जालना येथे समाजकल्याण कार्यालयाच्यावतीने मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सामाजिक न्याय दिनाच्या कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन सहायक आयुक्त राजू एडके यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

सामाजिक न्याय दिनाच्या कार्यक्रमास जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल, जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी जगदिश मिनियार आदि उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमापुर्वी सकाळी ८ वाजता नुतन वसाहत येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा ते सामाजिक न्याय भवनापर्यंत समता दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. समता दिंडी नुतन वसाहत येथून भाजी मंडई ते शासकीय रुग्णालय मार्गे येवून सामाजिक न्याय भवन येथे समता दिंडीचा समारोप होईल. असेही कळविले आहे.

## पंचमुखी महादेव मंदीर ते दर्गा वेस पर्यंतच्या रस्त्याचे काम तातडीने करा

### अन्यथा सोमवारी रस्ता बंद करू; नागरिकांचा जिल्हाधिकारी व महानगरपालिकेला ईशारा



**जालना । प्रतिनिधी -** शहरातील पंचमुखी महादेव मंदीर पाणीवेस ते दर्गावेस रस्त्याची दुरावस्था झाली आहे सध्या या रस्त्यावर पाणी साचत असून अतिक्रमण देखील मोठ्या प्रमाणात झाले आहे. त्यामुळे प्रवास करताना नागरिकांना अडचणी येत आहे. शिवाय वाहनं चालवताना देखील कसरती कराव्या लागत आहे. त्यामुळे या रस्त्याचं काम रखडलेलं काम येत्या ४ दिवसात पूर्ण करा अन्यथा सोमवारी काद्राबाद रस्ता आम्ही बंद करू असा ईशारा नागरीकांनी आज दिनांक २५ बुधवार रोजी दुपारी दोन वाजता दिला आहे. पंचमुखी महादेव

पान २ वर

# संपादकीय

## लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज!

लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती. आजच्याच दिवशी १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात त्यांचा जन्म झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव तर आईचे नाव राधाबाई असे होते. कोल्हापूर ( करवीर ) संस्थानचे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर महाराणी आनंदीबाई यांनी कोल्हापूरच्या गादीचे वारसदार म्हणून त्यांना १७ मार्च १८८४ रोजी दत्तक घेतले कारण चौथे शिवाजी महाराज यांना मुलबाळ नव्हते. दत्तक घेतल्यावर त्यांचे छत्रपती शाहू महाराज असे नाम करण करण्यात आले. शिक्षण पूर्ण झाल्यावर २ एप्रिल १८९४ रोजी ते कोल्हापूरच्या गादीवर विराजमान झाले. राज्यभिषेक झाल्यावर १९२२ पर्यंत म्हणजे २८ वर्ष ते कोल्हापूर संस्थानचे राजे होते. छत्रपती शाहू महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा पुढे चालवला. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवूनच त्यांनी राज्यकारभार केला म्हणूनच ते राजर्षी बनले. ते खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते. बहुजन समाजाला मानसिक गुलामीतूम बाहेर काढून, तत्कालीन रूढी परंपरा नाकारुन त्यांनी कोल्हापूर संस्थानामध्ये अनेक सामाजिक सुधारणा केल्या. शाहू महाराजांनी बहुजन समाजामध्ये शिक्षण प्रसार करण्यावर विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. शिक्षणाचे महत्व ओळखणारे देशातील पहिले राजे हे छत्रपती शाहू महाराज हेच होते. राज्यातील निरक्षर, गरीब, अस्पृश्य, दलित या बहुजन समाजातील लोकांना शिक्षण दिले तरच त्यांचा सर्वांगीण विकास होईल हे ओळखून त्यांनी समाजातील वंचित, दुर्लक्षित वर्गातील मुलांसाठी वसतिगृहे काढली. विविध जातीधर्मातील म ुलांसाठी त्यांनी २२ वसतिगृहे स्थापली त्यात शेकडो मुले शिकली. शिक्षण क्षेत्रात मुलींची संख्या वाढली पाहिजे या हेतूने त्यांनी मुलींना ४० रुपये स्कॉलरशिप सुरू केली. ब्रिटिश सरकार शिक्षणावर वार्षिक ८० हजार रुपये खर्च करत असताना कोल्हापूर संस्थानचा शिक्षणावरील वार्षिक खर्च हा एक लाख रुपये इतका होता. यातच शाहू महाराज यांची शिक्षणाविषयी किती तळमळ होती हे दिसून येते. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी सुवर्ण व अस्पृश्यांच्या वेगळ्या शाळा भरवण्याची दृष्ट पद्धत रद्द केली. गावच्या पाटलाने कारभार चांगला करावा यासाठी शिक्षण देणाऱ्या पाटील शाळा, तंत्र व कौशल्ये शिकवणाऱ्या शाळा त्यांनी सुरू केल्या. मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणायचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागांची तरतूद केली पाहिजे हा व्यापक विचार डोळ्यासमोर ठेवून ६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के जागा राखीव ठेवल्या म्हणूनच त्यांना आरक्षणाचे जनक असे म्हणतात. शाहू महाराजांच्या या निर्णयाला तेंव्हा खूप विरोध झाला पण विरोधाला न जुमानता त्यांनी या आरक्षणाची कठोर अंमलबजावणी केली. शाळा, दवाखाने, पाणवठे अशा सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांशी समतेने वागावे, त्यांच्याशी कोणीही भेदभाव करू नये असा आदेश त्यांनी काढला. १९१७ साली विधवा विवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. त्यांनी देवादासींची घातक प्रथा बंद केली. बहुजन समाजाला राजकीय प्रवाहात सामावून घेण्यासाठी १९१६ साली निपाणी येथे डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. जातिभेदाची प्रथा नष्ट व्हावी म्हणून त्यांनी आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली. इतकेच नाही तर आपल्या चुलत बहिणीचे लग्न धनगर समाजातील यशवंतराव होळकर यांच्याशी लावून दिले. छत्रपती शाहू महाराजांनी स्पिनिंग अँड व्हीविंग मिल, शाहूपुरी व्यापारपेठ, शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था, राधानगरी धरणाची उभारणी, शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करुन देणे असे अनेक उपक्रम आपल्या संस्थानात राबवले. त्यांनी शेतीच्या आधुनिकीकरणासाठी संशोधनाला पाठिंबा दिला. नगदी पिके आणि तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी किंग एडवर्ड ऍग्रीकल्चर इन्स्टिट्यूटची स्थापना केली. चित्रकला, लोककला, संगीत, साहित्य, नाट्य, कुस्ती या क्षेत्रातील कलावंतांना त्यांनी राजाश्रय मि ळवून दिला. शाहू महाराज आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे संबंध सर्वश्रुत आहे. बाबासाहेब मॅट्रिकमध्ये असताना आणि नंतर कोलंबिया युनिव्हर्सिटीत शिकत असताना त्यांनी बाबासाहेबांना स्कॉलरशिप दिली. २० आणि २१ मार्च १९२० रोजी माणगाव येथे अस्पृश्यता निवारण परिषदेत शाहू महाराजांनी बाबासाहेबांच्या कार्याचा गौरव करून कोल्हापूरच्या राजवाड्यात त्यांना जेवणाचे निमंत्रण दिले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक हे साप्ताहिक सुरू केले पण आर्थिक अडचणीमुळे पुढे ते बंद करावे लागले जेंव्हा हे शाहू महाराजांना समजले तेंव्हा त्यांनी २५०० रुपयांची आर्थिक मदत देऊन हे साप्ताहिक पुन्हा सुरू केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा समर्थपणे पुढे घेऊन जाण्याचे कार्य करणारा एक मानवतावादी राजा म्हणून शाहू महाराजांची इतिहासात नोंद आहे. व्यापक दूरदृष्टीच्या या राजाने त्याकाळी राजेशाही असूनही सामाजिक बंधुभाव, दलित व उपेक्षितांचा उद्धार, शिक्षण, उद्योगधंदे, कला, क्रीडा, आरोग्य या क्षेत्रांमध्ये जे कार्य केले आहे तसे कार्य आजवर कोणीही केले नाही. त्यांचे कार्य आजच्या आणि येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी मार्गदर्शक आहे. आज त्यांचा जन्म दिवस सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा केला जातो ही एकप्रकारे त्यांच्या कार्याला दिलेली मानवंदनाच आहे. जयंतीदिनी लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

### जगजेत्ता विश्वमान्य नेता; पंतप्रधान नरेंद्र मोदी

# चोवीस राष्ट्राचे सर्वोच्च नागरी सन्मानाने सन्मानित

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारला अकरा वर्ष पूर्ण होत असताना एक जगमान्य नेता म्हणून आपली प्रतिमा तयार केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या नेतृत्वाने भारताला जागतिक स्तरावर एक नवी ओळख तर मि ळवून दिलीच, पण जगातील अनेक देशांकडून त्यांना उच्च सन्मान मिळाला आहे. नरेंद्र मोदींना आतापर्यंत अनेक प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय सन्मान मिळाले आहेत, जे त्यांचे जागतिक महत्त्व आणि प्रभाव दर्शवतात. विश्वगुरू म्हणून म ोदीजींना अनेक देशांनी आपले सर्वोच्च सन्मान दिले आहेत. यामध्ये अमेरिका, रशिया, फ्रान्स, सौदी अरेबिया, श्रीलंका, अफगाणिस्तान, णए यांसारख्या प्रमुख देशांतील प्रतिष्ठित पुरस्कारांचा समावेश आहे. ज्यामुळे ते इतिहासातील सर्वात आंतरराष्ट्रीय स्तरावर सन्मानित भारतीय नेते बनले आहेत.

एकेकाळी आपल्या देशाच्या दोन पंतप्रधानानी आपल्या स्वतःच्या कार्यकाळात स्वतः स्वतः ची शिफारस करून स्वतःच स्वतःला भारतरत्न पुरस्कारने गौरविले होते. अन आताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना ११ वर्षा च्या कार्यकाळात आतापर्यंत २४ देशांनी त्यांच्या देशाचा सर्वोच्च नागरी पुरस्कारांनी सन्मानित केले आहे.

२०१४ पासून भारताचे १४ वे आणि सध्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मिळालेल्या पुरस्कार, सन्मान आणि मान्यतांची ही एक विस्तृत यादी आहे. २०२५ पर्यंत पंतप्रधान मोदींना परदेशी राष्ट्रांकडून दोन डझन भराहून अधिक नागरी सन्मान मिळाले आहेत, ज्यामुळे ते इतिहासातील सर्वात आंतरराष्ट्रीय स्तरावर सन्मानित भारतीय नेते बनले आहेत. येथे अशा देशांची यादी आहे ज्यांनी त्यांना त्यांच्या सर्वोच्च महत्त्वाच्या पुरस्कारांनी सन्मानित केले आहे.

सौदी अरेबिया (२०१६): अब्दुलअझीझ अल सौदचा आदेश (मुस्लिम नसलेल्या मान्यवरांना दिला जाणारा सर्वोच्च सन्मान) सौदीचे राजे सलमान यांच्याकडून पंतप्रधान मोदींना ऑर्डर ऑफ किंग अब्दुल अझीझ प्रदान करण्यात आला. अफगाणिस्तान (२०१६): गाझी अमीर अमानुल्ला खानचा राज्य आदेश. पॅलेस्टाईन (२०१८): पॅलेस्टाईन राज्याचा ग्रँड कॉलर. संयुक्त अरब अमिराती (२०१९): जायदचा आदेश (सर्वोच्च नागरी सन्मान). रशिया (२०१९): सेंट अँड्रयू द अपोस्टलचा आदेश (सर्वोच्च नागरी सन्मान) मालदीव (२०१९): निशान इज्जुद्दीनचा आदेश (विदेशी मान्यवरांना दिला जाणारा सर्वोच्च सन्मान). बहरीन (२०१९): किंग हमदचा आदेश पुनर्जागरण (तिसरा सर्वोच्च नागरी सन्मान). युनायटेड स्टेट्स (२०२०): लीजन ऑफ मेरिट (सर्वोच्च पदवी). भूतान (२०२१ /२०२४ मध्ये प्रदान करण्यात आले): ऑर्डर ऑफ द ड्रुक ग्याल्पो (सर्वोच्च नागरी सन्मान) पंतप्रधान मोदींना भूतानचे राजे जिग्मे खेसर नामग्याल वांगचुक यांच्याकडून ऑर्डर ऑफ द ड्रॅगन किंग प्रदान करण्यात येत आहे. फिजी (२०२३): कम्पेनियन ऑफ द ऑर्डर ऑफ फिजी (सर्वोच्च नागरी सन्मान). पापुआ न्यू गिनी (२०२३): ग्रँड कम्पेनियन ऑफ द ऑर्डर ऑफ लोगोहू (सर्वोच्च नागरी सन्मान). इजिप्त (२०२३): ऑर्डर ऑफ द नाईल (सर्वोच्च नागरी सन्मान). फ्रान्स (२०२३): ग्रँड क्रॉस ऑफ द लीजन ऑफ ऑनर (सर्वोच्च नागरी सन्मान). ग्रीस (२०२३): ग्रँड



क्रॉस ऑफ द ऑर्डर ऑफ ऑनर (दुसरा सर्वोच्च नागरी सन्मान). पलाऊ (२०२३): अबकाल पुरस्कार (नेतृत्व आणि शहाणपणाचे प्रतीक असलेले एक औपचारिक लाकडी वाद्य). कुवेत (२०२४): ऑर्डर ऑफ मुबारक अल-कबीर, कुवेती अमीर मिशाल अल-अहमद अल-जाबेर अल-सबाह यांच्याकडून पंतप्रधान मोदींना ऑर्डर ऑफ मुबारक द ग्रेट प्रदान करण्यात येत आहे. गयाना (२०२४): द ऑर्डर ऑफ उत्कृष्टता, पंतप्रधान मोदींना गयानाचे अध्यक्ष इरफान अली यांच्याकडून ऑर्डर ऑफ एक्सलन्स ऑफ गयाना प्रदान करण्यात आला. डोमिनिका (२०२४): डोमिनिका सन्मान पुरस्कार. नायजेरिया (२०२४): द ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द नायजर. मॉरिशस (२०२५): द ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ स्टार अँड की ऑफ द हिंद महासागर (सर्वोच्च नागरी सन्मान). श्रीलंका (२०२५): द मित्र विभूषण. सायप्रस (२०२५): ग्रँड क्रॉस ऑफ द ऑर्डर ऑफ म करियोस खखख (सर्वोच्च नागरी सन्म ान) १६ जून २०२५ रोजी सायप्रसने नवीनतम सन्मान प्रदान केला.

याव्यतिरिक्त आंतरराष्ट्रीय संस्थांनी पंतप्रधान मोदींना दिलेले इतर प्रतिष्ठित पुरस्कार:

सर्वोच्च नागरी सन्मानांव्यतिरिक्त, पंतप्रधान मोदींना प्रसिद्ध जागतिक संघटनांकडून अनेक प्रतिष्ठित पुरस्कार मिळाले आहेत. २०१८ मध्ये, जागतिक सुसंवाद आणि जागतिक शांततेसाठी त्यांच्या योगदानाबद्दल, त्यांना सोल पीस प्राइज कल्चरल फाउंडेशनने सोल पीस प्राइज प्रदान केले.

त्याच वर्षी, संयुक्त राष्ट्रांनी पंतप्रधान मोदींना त्यांच्या धाडसी पर्यावरणीय नेतृत्वासाठी त्यांचा सर्वोच्च पर्यावरण पुरस्कार, चॅम्पियन्स ऑफ द अर्थ पुरस्कार देऊन सन्मानित केले. २०१९ म ध्ये, पंतप्रधान मोदींना पहिला फिलिप कोटलर प्रेसिडेंशियल पुरस्कार मिळाला, जो दरवर्षी उत्कृष्ट राष्ट्रीय नेतृत्व दाखवणाऱ्या नेत्यांना दिला जातो.

भारताच्या स्वच्छ भारत अभियानाला स्वच्छतेच्या जनचळवळीत रूपांतरित करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांना मान्यता देण्यासाठी बिल अँड मेलिंडा गेट्स फाउंडेशनने २०१९ मध्ये पंतप्रधान मोदींना ग्लोबल गोलकीपर पुरस्काराने सन्मानित केले. २०२१ मध्ये, पंतप्रधान मोदींना केंब्रिज एनर्जी रिसर्च असोसिएट्स (उएठ) कडून जागतिक ऊर्जा आणि पर्यावरणीय शाश्वततेवरील त्यांच्या नेतृत्वाची दखल घेऊन ग्लोबल एनर्जी अँड एन्व्हायर्नमेंट लीडरशिप अवॉर्ड मिळाला.

यादीत काही अधिक लहान किंवा विशिष्ट पुरस्कारांचा समावेश असू शकतो, परंतु हे पंतप्रधान मोदींना मिळालेले प्रमुख आंतरराष्ट्रीय सन्मान आहेत.

पंतप्रधान मोदींना मिळालेल्या नागरी सन्मानांची संख्या विक्रमी २४ वर पोहोचली आहे, ज्यामुळे त्यांचे नेतृत्व आणि जागतिक स्तरावर भारताची वाढती प्रतिष्ठा अधोरेखित होते. विश्लेषकांचे मत आहे की हे भारताच्या मजबूत राजनैतिक संबंधांचे आणि देशाच्या वाढत्या प्रभावाचे प्रतिबिंब देखील आहे.

**संकलन**
**भाऊसाहेब वाकचौरे पाटील**
**जिल्हा संयोजक, भाजपा ,सोशल मिडीया सेल, उत्तर नगर जिल्हा**

**पान १ वरुन**

## जिल्हाधिकारी कार्यालयात ...

होती. १९७५ ते १९७७ या आणीबाणीच्या कालावधीत जालना जिल्ह्यातील ५६ व्यक्तींनी सामाजिक आणि राजकीय कारणांसाठी कारावास भोगला होता. या व्यक्तींना सन्मानपत्र देऊन गौरविण्याच्या सूचना शासनाकडून प्राप्त झाल्या होत्या. जिल्ह्यातील ५६ व्यक्तींपैकी उपस्थित व्यक्तींचा सन्मान या जिल्हास्तरीय कार्यक्रमात करण्यात आला. तसेच प्रत्येक संबंधित तालुक्यातही अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

१९७५ ते १९७७ काळात लागू केलेल्या आणीबाणीच्या काळात भारतीय लोकशाहीच्या रक्षणासाठी व मुल्याच्या जपणुकीसाठी अत्यंत कठोर परिस्थितीत निडरपणे उभे राहिलात. आपण हुकुमशाहीचा धाडसाने प्रतिकार करून, कारावास स्वीकारून स्वातंत्र्य अभिव्यक्ती आणि लोकशाहीच्या मूल्यांसाठी संघर्ष केला. देशाच्या लोकशाही परंपरेचे रक्षण करण्याच्या या लढ्यातील आपल्या योगदानाचा आम्ही अभिमानाने गौरव करीत आहोत. हे सन्मान पत्र आपल्या त्याग, धैर्य आणि दृढतेला सलाम करण्यासाठी आहे. आपण आपल्या कृतीतून विचारांतून आणि त्यागातून नव्या पिढीसमोर लोकशाही मुल्यांचा आदर्श ठेवला आहे आणि त्याचा आम्हाला अभिमान आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सन्मान पत्रात नमूद केले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा माहिती कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाधिकारी कार्यालयातील अपर जिल्हाधिकारी यांच्या कक्षासमोरील सभागृहात आणीबाणी कालावधीतील चित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील प्रदर्शन एक महिनाभर सर्वांसाठी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत खुले राहणार आहे. याचा लाभ नागरिकांनी घ्यावा. असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## केएमएलचा शासन ...

मुल्यांकन काढताना संबंधित शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे. त्यामुळे जेथे ३ वर्षात उच्चांकी व्यवहार झालेले असतील तेथे ते व्यवहार ग्राह्य धरुन मुल्यांकन काढण्यात यावे आणि जेथे व्यवहारच झालेले नसतील तेथे नैसर्गिक न्यायानुसार रेडिरेकनरमध्ये दरवर्षी १० टक्के वाढ ग्राह्य धरुन त्यादृष्टीने मुल्यांकन काढण्यात यावे, अशी मागणी श्री. टोपे यांनी केली. नागपूर-मुंबई महामार्गासाठी शेतकऱ्यांना जसा मावेजा देण्यात आला त्याचप्रमाणे जालना-नांदेड समृध्दी बाधित शेतकऱ्यांनाही दिला पाहिजे. बाधीत शेतकऱ्यांच्या रास्त म ागण्यांचा सहानुभूतीपुर्वक विचार करुन न्याय दिला तरच या सरकारला माय-बाप सरकार म्हणता येईल, असेही माजी मंत्री टोपे यांनी म्हंटले आहे.

## पर्यावरणाची काळजी ...

विविध बँकांकडून सवलतीच्या व्याजदरात कर्जाची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. सौर ऊर्जा योजनेत सहभागी होऊन हरित ऊर्जा निर्माता बनून पर्यावरण संरक्षन देखील करता येईल. या योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने प्रथम येईल त्याला प्रथम प्राधान्य अशी रचना करण्यात आली आहे असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

सौर ऊर्जेचा वापर करून, आपण वीज कंपन्यांवरील अवलंबित्व कमी करू शकतो. सौर ऊर्जा हा एक अक्षय म्हणजे तो कधीही न संपणारा ऊर्जा स्त्रोत आहे. सूर्यप्रकाशामुळे सौर ऊर्जा सतत उपलब्ध असते. जगाला भविष्यात लागणाऱ्या ऊर्जे ची गरज पूर्ण करण्यासाठी सौर ऊर्जा एक चांगला पर्याय आहे. सौर ऊर्जेचा वापर पाणी गरम करण्यासाठी, घरांना प्रकाश देण्यासाठी, तसेच विविध उपकरणे चालवण्यासाठी होतो. सौर ऊर्जेचा वापर शेतीमध्ये सिंचनासाठी, वाळवणीसाठी आणि इतर कामांसाठी होतो. सौर ऊर्जेचा वापर करून, दुर्गम भागांमध्ये जिथे वीज पोहोचलेली नाही, तिथेही वीज उपलब्ध करता येते. सौर ऊर्जा क्षेत्राचा विकास होत असल्यामुळे, या क्षेत्रात नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत. सौर पॅनेल बसवणे, त्यांची देखभाल करणे, तसेच सौर ऊर्जा उत्पादनासारख्या कामांसाठी कुशल मनुष्यबळाची गरज असते. असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पीएम सूर्य घर मोफत वीज योजना सुरू करण्याची घोषणा केली आहे, ज्या अंतर्गत दरम हा ३०० युनिटपर्यंत मोफत वीज दिली जाईल. ही योजना सुरू करण्यामागील सरकारचे उद्दिष्ट देशातील १ कोटी घरांना मोफत वीज उपलब्ध करून देण्याचे आहे. या योजनेत, प्रत्येक कुटुंबासाठी २ घथ पर्यंतच्या सौरऊर्जा प्रकल्पाच्या किमतीच्या ६०% रक्कम अनुदानाच्या स्वरूपात खात्यात येईल. जर एखाद्याला ३ घथ चा प्लांट लावायचा असेल तर १ घथ च्या अतिरिक्त प्लांटवर ४०% सबसिडी मिळेल. ३ किलोवॅट क्षम तेचा प्लांट उभारण्यासाठी सुमारे १.४५ लाख रुपये खर्च येणार आहे. त्यापैकी ७८ हजार रुपये शासन अनुदान देणार आहे. उर्वरित ६७ हजार रुपयांसाठी सरकारने स्वस्त बँक कर्जाची व्यवस्था केली आहे. बँका रेपो दरापेक्षा फक्त ०.५% जास्त व्याज आकारू शकतील असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

**सातोना येथे महिला बचत गटांना आमदार बबनराव लोणीकर यांच्या शुभहस्ते १३ लाख ६० हजार रुपयांचे कर्ज वितरण**

सातोना येथे महिला बचत गटांना आमदार बबनराव लोणीकर यांच्या शुभहस्ते १३ लाख ६० हजार रुपयांचे कर्ज वितरण करण्यात आले. लक्ष्मी (१ लक्ष), वंदना (५० हजार), कुलस्वामिनी (१ लक्ष), सिद्धिविनायक (१ लक्ष), साईराज (१ लक्ष ५० हजार), अण्णाभाऊ साठे (१ लक्ष) गणेश (१ लक्ष), आदर्श (१ लक्ष), जय सेवालाल (१ लक्ष), जिजाऊ (६० हजार), ताराराणी (६० हजार), समर्थ (६० हजार), अमानत (३० हजार) अक्षरा (६० हजार), गायत्री (१ लक्ष ५० हजार), सखी (१ लक्ष), भूमी (१ लक्ष ५० हजार), तुळजाभवानी (१ लक्ष), प्रज्ञा (१ लक्ष), भगवती (४० हजार), शिवगणेश (१ लक्ष) असे बचत गटांना विचलित करण्यात आलेल्या कर्जाचे स्वरूप होते. यासाठी जीवन ज्योती महिला ग्राम संघाच्या वतीने पुढाकार घेण्यात आला होता.

या संदर्भात पुढे बोलताना आमदार लोणीकर म्हणाले की, महिला बचत गटांना कर्ज वितरण करणे अत्यंत महत्त्वाचे असून यामुळे महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनण्यास मदत होते, तसेच त्यांच्या कुटुंबाच्या आणि समाजाच्या विकासालाही चालना मिळते. महिलांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी किंवा आधीच असलेल्या व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी कर्जाची आवश्यकता असते. बचत गटांच्या माध्यमातून कर्ज मिळाल्याने, महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होण्यास मदत होते. बचत गटांना कर्ज उपलब्ध झाल्यावर, महिलांना उत्पन्नाचे नवीन मार्ग मिळतात, ज्यामुळे त्यांचे आणि त्यांच्या कुटुंबाचे दारिद्र्य कमी होते. महिलांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी किंवा आधीच असलेल्या व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी कर्जाची आवश्यकता असते. बचत गटांच्या माध्यमातून कर्ज मिळाल्याने, महिलांना स्वतःचा व्यवसाय वाढवण्यास मदत होते असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष शत्रुघ्न कणसे उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड तहसीलदार प्रतिभा गोरे, रमेशराव भापकर, संभाजी वारे, परमेश्वर आकात निवृत्ती लाटे गुलाबराव लाटे विलास आकात, कोंडीराम आकात भोजीराम आकात गजानन लिपणे, मोहनराव आढे, पदमाकर कवडे, सुधाकर पडूळकर, डॉ.गजानन केशरखाने, सौ. कमलबाई केशरखाने (सरपंच), बद्रीनारायण खवणे, बंडू मानवतकर, राजेश माने, कुंडलीक उघडे, इस्माईल शेख, बाबाभाई शेख, सौ.विजयमाला खवणे, सौ. रेणूका शिंदे, सौ. कांताबाई सातपुते, सौ. सुशिला अंभीरे, सौ. दुर्गाबाई पडूळकर, विठ्ठल बिडवे रंगनाथ रेंगे भगवान आरडे परमेश्वर लाटे सय्यद भाई, छायाताई घोरबांड अर्चना आकात गणपत वारे, उद्धव वायाळ, राधाकीशन माने, बाळासाहेब अभिरे, नजिर भाई पटेल, कृष्णा निकम, राजु दादा वायाळ, जगदीश पडूळकर, राधेशाम पाटोळे राजेश आळने, कैलास आग्रवाल आस्लम सय्यद, शुभम आढे, राजेश माने, सालर पठाण, सिराज पठाण, माधवसिग जनकवार, मुसाभाई शेख, सुधाकर पडुककर, अनिल मोरे, रतन सिरसाठ, डिगाबर मोरे, पोपटराव खंदारे सोपानराव वायाळ सुभाषराव बागल कार्यकारी अभियंता महावितरण श्री मठपती, गटविकास अधिकारी राजेश तांगडे ग्रामपंचायत अधिकाऱ्या संघटनेचे जिल्हाध्यक्ष डीबी काळे, ग्रामपंचायत अधिकारी नामदेव काळे, बी एस चव्हाण यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## पंचमुखी महादेव ...

मंदीर ते दर्गा वेस पर्यतच्या रस्त्याचे काम तातडीने करा अशी मागणी या भागातील नागरीकांनी जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ तसेच पोलीस अधीक्षक व महापालिका आयुक्तांकडे केली आहे. निवेदन देऊन ही मागणी करण्यात आली आहे.या परिसरात दुर्गंधीची समस्या निर्माण झालेली आहे. सर्वप्रथम अतिक्रमणाचा विळखा, रस्त्याची झालेली दुरावस्था,अंडर ग्राऊंड नाली नसल्या कारणामुळे सर्व घाणीचे साम्राज्य आणि विद्युत पोल रस्त्यांच्या मधोमध असल्याने दररोज होणारे अपघातांचे संकट नागरिकांच्या जिवावर बेतले आहे. या परिसरातुन जाणारा हा मुख्य रस्ता आहे. त्यामुळे येथुन सतत रहदारी चालु असते.मोठ मोठी अवजड वाहने येथुन वाहतुक करतात.या सर्व कारणामुळे येथील घाणीचे साम्राज्य, रस्त्याची दुरावस्था त्यामुळे उडणारी धुळ, ही आरोग्यास अतिशय घातक ठरत आहे. यामुळे परिसरातील नागरिकांना आणि बालकांना मलेरिया,डेंग्यू सारखे आजार पसरत असून त्यांचा जीव धोक्यात आहे.

याआधी ९ जानेवारी २०२५ रोजी दिलेल्या निवेदनावर कारवाई करण्यात आली होती. पण ती कारवाई अर्धवट राहीली. रस्त्याचे आणि अतिक्रमण हटविण्याचे काम तात्काळ सुरू करावे, नसता या भागातील त्रस्त नागरीक येत्या ३० जून रोजी पाणीवेस येथे लोकशाही मार्गाने रास्ता रोको आंदोलन करतील. या आंदोलनात काही बरेवाईट झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी शासन आणि प्रशासनावर राहील.असा ईशारा भागातील नागरीकांनी महापालिका आयुक्तांना दिला आहे. यावेळी सेवकराम नारियलवाले, आरिफ खान, रवि सोनटके, चंद्रकांत जाधव, अख्तर भाई कुरेशी, संतोष भंवर, राजू दोडके, जहीर शेख, राम मोरे, बबलू छड़ीदार, राकेश वैष्णव यांच्यासह परिसरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती..

## सिलंबम स्पोर्ट्स मराठवाडा विभाग स्तरमध्ये जीईएसच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश



**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा सिलंबम स्पोर्ट्स असोसिएशन सलंग्न महाराष्ट्र सिलंबम फेडरेशन व भारत सरकारच्या युवक कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय तर्फे आयोजित मराठवाडा विभागस्तरीय सिलंबम स्पर्धेचे नुकतेच करण्यात आले. या स्पर्धेत राजूर येथील जि. ई. एस. एज्युकेशनल ग्रुपच्या विद्यार्थिनी श्रद्धा कढवणे आणि संतोषी गायकवाड यांनी वैयक्तिक क्रीडा प्रकारात अनुक्रमे सुवर्ण (गोल्ड) व रौप्य (सिल्वर) पदक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले. या स्पर्धेमध्ये बीड, गेवराई, पूर्णा, परभणी, सिल्लोड, बिडकिन, छत्रपती संभाजीनगर आणि जालना या जिल्ह्यांतील अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर पुंगळे, प्राचार्या आशाताई पुंगळे यांनी विद्यार्थीनीचे पुष्प गुच्छ देऊन सत्कार केला तसेच सर्व शिक्षक, शिक्षिका व कर्मचाऱ्यांनी विजेत्या विद्यार्थिनींचे अभिनंदन करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या मुलींना शाळेचे क्रीड़ा शिक्षक व असोसिएशन चे मराठवाड़ा विभाग प्रमुख यांच्या मार्गदर्शना खाली प्रशिक्षण मिळाले असून राष्ट्रीय सिलंबम स्पोर्ट्स साठी या मुलिंची तैयारी सुरु आहे असे श्री यादव यांनी सांगितले

दूध डेअरींवर मनपा पथकाची कारवाई

## दोन क्विंटल प्लास्टिक कॅरीबॅग जप्त



**जालना । प्रतिनिधी -** शहरातील दोन दूध डेअरींवर महानगर पालिका पथकाने कारवाई करत दोन क्विंटल प्लास्टिक कॅरीबॅग जप्त केल्या आहेत.सिंगल युज प्लास्टिकवर बंदी घालण्यात आलेली असतानाही या दूध डेअरीमधून या प्लास्टिकचा सर्रासपणे वापर सुरू होता ही बाब समोर आल्यानंतर महापालिका पथकाने दुःखीनगर भागातील पटेल दूध डेअरी आणि भारत दूध डेअरींवर धाड टाकली.या धाडीत तब्बल दोन क्विंटल प्लास्टिक कॅरीबॅग जप्त केल्या असून दोन्ही दुकानावर दंडात्मक कारवाई करण्यात आली असल्याची माहिती महानगरपालिका उपायुक्त सुप्रिया चव्हाण, यांनी दिली यावेळी महापालिकेच्या सहाय्यक आयुक्त सुप्रिया चव्हाण, स्वच्छता निरीक्षकः शोएब खान , शुभम जाधाव ,नरेंद्र दाभाडे, जवान किरण प्रधान, भाऊसाहेब सोनवणे, मंगेश साठे, दिलीप हिवाळे, स्वच्छता विभागाचे सर्व कर्मचारी पदाधिकारी यांची उपस्थिती होती

## जैन माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय जालना येथे योग दिन उत्साहात




**जालना । प्रतिनिधी** - येथील श्री म. स्था. जैन माध्यमिक विद्यालय जालना येथे दि २१ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला .यावेळी विद्यालयातील शिक्षिका श्रीमती शीला म स्के यांनी व विद्यालयातील विद्यार्थ्यांनी योग प्रात्यक्षिके व विविध असने करून दाखविली. योगाचे मानवी जीवनातील महत्त्व आणि त्याची गरज काय आहे हे विद्यार्थ्यांना सांगसांगितले. यावेळी विद्यालयातील एनसीसीच्या व इतर सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून उत्कृष्टपणे प्रात्यक्षिके व आसने सादर केली . याप्रसंगी मुख्याध्यापक श्री वानगोता यांनी योग दिनाचे महत्त्व सांगून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. व. कार्यक्रमास विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. एस एम वानगोता पर्यवेक्षिक श्रीमती सोमानी पर्यवेक्षक श्री शिंदे क्रीडा शिक्षक सौ शीला मस्के सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षकानी परिश्रम घेतले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती सोमानी यांनी केले आभार श्रीमती मस्के यांनी व्यक्त केले.

## सावधान! कोणत्याही नशेच्या आहारी जाणे घातकच

दरवर्षी २६ जूनला जगभर आंतरराष्ट्रीय नशा निरोधक दिवस साजरा केल्या जातो.नशेली वस्तुंचे निवारण व्हावे या उद्देशाने संयुक्त राष्ट्र महासभेने ७ डिसेंबर १९८७ ला एक प्रस्ताव पारित केला व त्या अनुषंगाने युनोने १९८८ पासून दरवर्षी नशेली पदार्थांच्या सेवनाने होणाऱ्या दुष्परिणामाच्या प्रती समाजात जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने दरवर्षी २६ जूनला आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी दिवस म्हणून साजरा केल्या जातो.सध्याच्या आधुनिक युगात नशेच्या सेवनाचे प्रमाण वाढल्याने नशेली पदार्थांचा वाममार्गाने मोठा व्यापार आपल्याला दिसुन येतो. कोणतीही नशा असो शरिराला व आयुष्याला घातकच आहे. कारण नशा हा शब्दच असा आहे की प्रत्येकांचे आयुष्य उद्ध्वस्त करतो मग ती कोणतीही नशा असो.त्यामुळे आजच्या युवा पिढीने नशेली पदार्थांपासून सावधान रहाणे अत्यंत गरजेचे आहे.कारण नशेली वस्तू युवावर्गापर्यंत पोहोचविण्याचे काम तस्करीच्या माध्यमातून केले जाते.भारतात बांगलादेश,पाकिस्तान,नेपाळ,ईरान, अफगाणिस्तान मार्गे विदेशी तस्कर नशेली पदार्थ पुरविण्याचे काम करीत असतात.ड्रग्स पुरवठ्याचे जाळे तस्करीच्या माध्यमातून संपूर्ण जगभर विनल्या गेले आहे.भारतार दर महिन्याला अवैधरित्या आलेली करोडो रुपयांची ड्रग्स,एमडी पकडली जाते. तरीही युवावर्गामध्ये नशेचे प्रमाण अजूनही कमी झालेले नाही ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.मागीलवर्षी २२ जून २०२४ ला गुजरातच्या समुद्र किनाऱ्यावर बीएसएफ जवानांनी १५० करोड रुपयांची ड्रग्स पकडली ही ड्रग्स कच्छच्या क्रिक भागात लावारिस पडलेली सापडली. सरकारी माहितीनुसार या ड्रग्सचे तार ईरान व अफगाणिस्तानशी असल्याचे सांगण्यात आले होते.यावरून स्पष्ट होते की काही विदेशी असामाजिक तत्व भारतीय युवा पिढीला नेशेच्या खाईत लोटण्याचे काम करीत आहे.त्यामुळे आजच्या तरुण पिढीने व युवा वर्गाने नशेली पदार्थांपासून सावध रहाने अत्यंत गरजेचे आहे.कारण कोणतीही नशा ही महाघातक असते. कोणत्याही नशेपासुन शरिराला यत्किंचितही लाभ होत नाही;उलट त्याचे शरिरावर व परिवारावर मोठ्या प्रमाणात दुष्परिणाम होतांना दिसतात. सध्याच्या परिस्थितीत हॉटेल किंवा हुक्का पार्लर मधुन ड्रग्सचा पुरवठा होतो हेही लक्षात आले आहे. त्यामुळे अशा हॉटेलवर प्रशासनाकडुन कठोर कारवाई व्हायला हवी. अशाच पध्दतीने पबमध्ये सुद्धा ड्रग्सचा गोरखधंदा चालत असावा याला सुध्दा नाकारता येत नाही. यावर प्रशासनाने लक्ष केंद्रित केले पाहिजेत.देशात नशेली पदार्थांवर प्रतीबंध आहे. देशासह जगातील युवावर्गाने २६ जूनला शपथ घेतली पाहिजे की मी माझ्यासाठी, माझ्या परिवारासाठी व देशाच्या भविष्यासाठी यापुढे कोणतीही नशा करणार नाही तेव्हाच खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी दिवस समजल्या जाईल.कारण ड्रग्सची नशा ही नशा करणाऱ्यांचे आयुष्याची छल्ली तर करतोच सोबतच परिवाराला असमंनजस्यतेमध्ये टाकुन संपूर्ण परिवार विस्कळीत होतो. यामुळे संपूर्ण घर उध्वस्त होते याचे मुख्य कारण म्हणजे फक्त नशा. आपण साधारणतः नशेली वस्तू व पोषक वस्तू यांचा विचार केला तर मनुष्यासाठी नशेली वस्तूंच्या तुलनेत पोषक वस्तू खुपचं स्वस्त असतात. त्यामुळे नशा करणाऱ्यांनी मनावर ताबा ठेवुन नशेली पदार्थांचा विरोध करावा व युवकांनीच जगाला संदेश देवुन नशेली पदार्थांचा निषेध केला पाहिजे. कोणत्याही नशेली वस्तुंसाठी रांगेत उभे रहाने म्हणजे मृत्यूच्या रांगेतउभे रहाल्यासारखे आहे. याची जानीव आजच्या युवा पिढीने लक्षात ठेवली पाहिजे. कोणीही कीतीही नशेली वस्तु देण्याचा प्रयत्न केला तरीही आपण जर आपल्या मनावर ताबा ठेवला तर कोणतीही नशेली वस्तु तुम्हाला स्पर्शसुध्द करू शकत नाही हेसुद्धा तेवढेच सत्य आहे.त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत प्रत्येकांनी आपल्या आयुष्याची काळजी घ्यायला हवी.त्यामुळे कोणत्याही नशेपासुन सावधगिरी बाळगली पाहिजे.आपण सुदृढ रहालो तर आपली पिढी सुदृढ राहील त्याचप्रमाणे आपण सुरक्षीतरीत्या जगलो तर तर देश सुरक्षित राहील, देश सुरक्षित रहाला तर जग अवश्य सुरक्षित होईल.याकरीता अंमली पदार्थ विरोधी दिनाच्या निमित्ताने आपण संकल्प करूया की नशेली वस्तूला टाटा-बाय-बाय करू या.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## सौ कविता काबरा यांनी डी फॉर्मसी ची परीक्षा पास झाल्याबद्दल सत्कार

**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** एखादे ध्येय प्राप्त करून घ्यायचे असल्यास इच्छा शक्ती मजबूत ठेवल्यास यश प्राप्ती होते असे म्हणतात. त्याचे उदाहरण म्हणजे टेंभुर्णी येथील सौ कविता प्रशांत काबरा होय. येथील माहेश्वरी समाजाचे ज्येष्ठ व्यक्ती डॉ गंगाबिसन काबरा यांच्या सून बाई ने घरची सगळी कामे करून आपल्या तुम्ही मुला पैकी दोघाला डॉक्टर करत असून एक मुलगी सी ए शिकत असून सगळी सामाजिक दाइत्व पार पाडून झालेली ध्येय यश प्राप्ती ही मोठी असते. या मुळे समाजाचे जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते ऍड प्रेमसुख काबरा यांनी सुन कविता काबरा चे सत्कार करत अभिनंदन केले आणि शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी डॉ गंगाबीसन काबरा सौ शकुंतला काबरा, डॉ प्रशांत काबरा,समाजाचे जेष्ठ घनशमदास काबरा,नंदलाल काबरा, गणेशालल सोमाणी, ड विष्णू शिंदे, जेष्ठ पत्रकार मोहन मुळे यादी या वेळी उपस्थित होऊन अभिनंदन केले.

या वयात सगळे घर संसार सांभाळून केलेले यश प्राप्त हे कमालीचे असून आम्ही सत्कार केल्याचे या वेळी ड प्रेमसुख काबरा यांनी भावना व्यक्त केली.



# सातेफळ येथील शिक्षकांची रिक्त पदे तात्काळ न भरल्यास ग्रामस्थांचा आंदोलनाचा इशारा

**विशाल देशमुख**

**जाफराबाद -** तालुक्यातील सातेफळ जिल्हा परिषद शाळेत गेल्या कित्येक वर्षापासून शिक्षकांची अनेक पदे रिक्त असल्यामुळे विद्यार्थ्यांचे प्रचंड प्रमाणात शैक्षणिक नुकसान होत आहे जर एका आठवड्यात सदर पदे भरली नाहीत तर जिल्हा परिषद जालना या ठिकाणी विद्यार्थी घेऊन 'शाळा भरो' आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे

याबाबत सविस्तर असे की, सातेफळ जिल्हा परिषद शाळेत इयत्ता पहिली ते आठवीचे वर्ग असून दोनशे दहा विद्यार्थी शिक्षण घेत आहेत परंतु या विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी शाळेत केवळ पाच च शिक्षक कार्यरत आहेत शाळेतील मुख्याध्यापक यांची तक्रारीने प्रतिनियुक्ती करण्यात आलेली आहे गेल्या तीन वर्षांपासून त्यांच्या जागेवर अद्याप पर्यंत कायमस्वरूपी मुख्याध्यापक शाळेला देण्यात आलेला नाही तसेच शाळेतील सम ाजशास्त्र या विषयाचे पद गेल्या पाच वर्षापासून रिक्त आहे. त्यानंतर गणित व विज्ञानाचे शिक्षक येत्या ३० जून रोजी सेवानिवृत्त होत आहे त्यांच्याकडे तात्पुरत्या स्वरूपात मुख्याध्यापक पदाचा पदभार देण्यात आलेला होता ते सेवानिवृत्त होत असल्याने गणित व विज्ञानासारख्या महत्त्वाच्या विषयाचे पद पर्यायाने रिक्त आहे एकीकडे जिल्हा परिषदेच्या शाळा विद्यार्थ्यांविना शेवटच्या घटका मोजत असताना सातेफळ ग्रामस्थांचा शाळेवरील विश्वास व येथील कार्यरत उपक्रमशील शिक्षकांमुळे शाळेत सव्वादोनशे विद्यार्थी शिक्षणाचे धडे आजही गिरवत आहे त परंतु शिक्षकांची



पदे रिक्त राहिल्यास त्याचा विद्यार्थी संख्येवर व गुणवत्तेवर विपरीत परिणाम होऊ शकतो त्यामुळे रिक्त शिक्षकांची पदे त्वरित भरावीत अन्यथा तिव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा ग्राम पंचायत सदस्य तथा सामाजिक कार्यकर्ते प्रभू बनकर यांनी गटशिक्षणाधिकारी जाफ्राबाद यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे

याकडे वरिष्ठ अधिकारी कार्यकारी मुख्याधिकारी व जालना शिक्षण विभागाने लक्ष देऊन रिक्त जागा भरावी अशी मागणी अशी मागणी जोर धरत आहे

# सेवानिवृत्त अंगणवाडी सेविकांचा सेवा गौरव

**धाकलगांव । प्रतिनिधी -** अंबड तालुक्यातील धाकलगाव येथील अंगणवाडी सेविका कमल रामभाऊ हराळे व डोमेगांव येथील शोभाबाई त्रिंबक रणमळे या नुकत्याच सेवानिवृत्त झाल्या आहेत. दरम्यान, धाकलगाव येथे बुधवारी ( ता. २५) त्यांचा सेवागौरव कार्यक्रम पार पडला. यावेळी मनोगत व्यक्त करताना खुप आठवणी व अनुभव सांगताना सर्वांना भावनिक केले.अंगणवाडी सेविका म्हणून ३५ वर्षे नौकरी केली. पण आता घरी असताना काही तरी हरवलं असे वाटते.असे मनोगत व्यक्त केले. यावेळी पर्यवेक्षिका लता उगले, अंगणवाडी सेविका पुजा रोटे , मनिषा नाझरकर, प्रतिभा गणगे,जुलेखा पठाण, कल्पना उंडे, प्रियांका देवडे, आशा ढोणे यांच्यासह वडिगोद्री बिट मधील सर्व सेविका व मदतनीस उपस्थित होत्या.



# टेंभुर्णी चे भूमिपुत्र डॉ गणेश चंदनशिवे यांचा विशेष सत्कार



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** भूमिपुत्र असलेले नुकताच झालेल्या पुरस्कार बद्दल त्यांचे विशेष सत्कार करून त्यांना संभाजी नगर येथील रुक्मिणी सभागृह येथे भव्य दिव्य सत्कार संभारभ पार पडला.

टेंभुर्णी गावचे सुपुत्र प्रसिद्ध लोककलावंत,सिने पार्श्वगायक तथा मुंबई विद्यापीठाच्या लोककला एकादमीचे प्रमुख व लोककला अभ्यासक डॉ.गणेश चंदनशिवे यांना एम जी एम परिसर संभाजीनगर येथे अखिल भारतीय नाट्य परिषदेचा सर्वोत्कृष्ट उत्कृष्ट लोककलावंत पुरस्कार सोहळ्याला उपस्थित मोठ्या थाटात झाला ह्या सोहळ्याला आपल्या गावचे सरपंच प्रतिनिधी गौतम म्हस्के,डॉ.सतीश चंदनशिवे, राजू खोत,डॉ मुकेश मोठे दीपक जमधडे, डॉ.अमोल वाघ साहेब,गौतम चंदनशिवे आदी टेंभुर्णीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

पुरस्कार भेटल्या नंतर डॉ गणेश चंदनशिवे यांनी आपले मनोगत मांडता वेळी सांगितले की मला भेटलेला पुरस्कार मध्ये माझ्या गावाचे मला खूप सहकार्य आणि शुभेच्छा असतात नक्कीच या पुरस्कार मध्ये त्यांचा सिंहाचा वाटा असून मला त्याचा शुभेच्छा अश्याच निरंतर भेटत राहो असे मनोगत मांडून भेटलेल्या पुरस्कार बद्दल आणि शुभेच्छा बद्दल त्यांनी सर्वांचे आभार मानले.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.